**नियमित दिवाणी दावा क्र.५७६/२०२३**

(अनिता वगैरे वि. हणुमंत व इतर)

**CNR No.MHSO07-000705-2023**

**<u>निशाणी क्र.१७ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, याकामी जुनी व महत्वाची कागदपत्रे त्यांना मुदतीत उपलब्ध झाले नाहीत. तसेच प्रतिवादी हे वयस्कर असून वयोमानामुळे उद्भवणा–या आजारामुळे त्यांना मुदतीमध्ये वकिलांची भेट घेऊन कैफियत दाखल करता आले नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने त्यांचेदेखील मौलिक हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना देखील त्यांच्या बचावाची संधी मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू

तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. सबब, खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात येत आहे. |
| ३. | प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.१५ वरील आदेशाची पूर्तता केल्यानंतर त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे. |

PRAVIN PUNDLIK BAGUL

Digitally signed by PRAVIN PUNDLIK BAGUL
Date: 2024.09.05 13:32:01 +0530

(पी. पी. बागुल)

दिनांकः– ०४.०९.२०२४

४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर

# Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 04.09.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 04.09.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 05.09.2024 |